चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१३ में, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# अवघ्या २४ तासातच मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघड तळोधी पोलीसांची कार्यवाही

दिनांक १०/०५/२०१९ रोजी पोलीस स्टेशन तळोधी येथे फिर्यादी नामे निकेश वसंता खोब्रागडे, रा. काळजसर चिमुर यांनी तक्रार दिली की, ते आपल्या नातेवाईकाकडे नांदेळ, तळोधी येथे गेले असता रात्रो दरम्यान त्यांची दुचाकी हिरो होंडा स्प्लेंडर प्लस एम.एच. ३१ बी.एक्स ७५४ ही कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेली. अशा रिपोर्टवरून पोलीस स्टेशन तळोधी येथे अप.क्र. १०२/२०१९ कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच पोलीसांनी तपासादरम्यान वेगवेगळे तर्क लावुन दुचाकीचा शोध घेण्यास सुरूवात केली. आजुबाजुच्या परिसरातील लोकांना विचारपुस करण्यात आली. दिनांक १२/०५/२०१९ रोजी तपासदरम्यान पोलीसांना गोपनीय सुत्राकडुन माहिती मिळाली की, एक इसम आपल्या ताब्यात एक संशयीत दुचाकी वाहन घेवुन फिरत आहे. अशा माहितीवरून सदर इसमास ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता, त्याचे ताब्यात चोरीस गेलेली हिरोहोंडा स्प्लेंडर प्लस एम.एच. ३१ बी.एक्स ७५४ मिळुन आली. सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्याची कसुन चौकशी केली असता, त्याच्या माहिती समोर आली की, त्यांनी याआधी सुध्दा दुचाकी वाहन चोरी केले आहे आणि ते आपल्या घरी लपवुन ठेवलेले आहे. यावरून पोलीसांनी सदर आरोपी नामे राजु बालाजी धुर्वे वय २५ रा. धामनगाव चक याचे घराची झडती घेतली असता त्याचे जवळ खालीलप्रमाणे मोटारसायकली मिळुन आल्या.

१)हिरो होंडा स्प्लेंडर प्लस एमएच ३२ एच ८८२४,
२)होंडा ॲक्टीवा एमएच एक्स ७१६३
३)हिरो होंडा सिडी डिलक्स
४)हिरो होंडा स्प्लेंडर प्लस एम. एच ३१ बीसी ७८३४

सदरचा गुन्हा हा २४ तासाच्या आतच उघडकिस आला असुन आरोपी कडुन एकुण ०५ मोटारसायकली हस्तगत करण्यात आले आहे. पुढिल तपास तळोधी पोलीस करीत आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडडी यांचे मार्गदर्शनात, उपपिवभागीय पोलीस अधिकारी ब्रम्हपुरी श्री. प्रशांत परदेशी यांचे नेतृत्वात पोलीस स्टेशन तळोधी प्रभारी सपोनि. श्री. शिरसाठ यांचे सह तळोधी येथील पोलीस पथकाने पार पाडली.

---